**कार्यकारी अभियंताबीड,बीड पाटबंधारे विभाग ,**
सरकारी दवाखान्यासमोर बार्शी रोड बीड 431122
दूरध्वनी क्र 222351 (02442) (कार्यालय ).फॅक्स222355
E-mail : **executivebeed@gmail.com,**

जा.क्र.बीपाविबी / भांशा / 350 /सोबत दिनांक :- 01/02/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरुड,
पुणे 411038

विषय :- विभागीय कार्यालयात बाहय यंत्रणेकडून सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती करणे बाबत.

संदर्भ - 1. गो.म.पा.वि.महामंडळ कार्यालयाचे पत्र.जा.क्र.आ-2 / 4384 दि 10.06.2021
2. प्रादेशिक कार्यालयाचे पत्र.जा.क्र.पशा- 4 / 3049 दि. 27.08.2021
3. शासन निर्णय क्र. पदनि -2016 / प्र.क्र.29/16 वित्त सुधारणा -1 दि 02.08.2016

वरील विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, जलसंपदा विभागातील बाहय यंत्रणेकडून सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती करणे बाबत जाहीरात आपणाकडे पाठविण्यांत येत आहे. तरी सदर दरपत्रक सूचना [illegible] https:/wrd.maharashtra.gov.in या वेबसाईट वर दिनांक 07/02/2022 व त्यापूर्वी प्रसिध्द करावे. सस्नेह अग्रेषीत.

सोबत -: दरपत्रक सूचना

O/C

( उ.वि.वानखेडे )
कार्यकारी अभियंता,
बीड पाटबंधारे विभाग,बीड

प्रत - मा.अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ यांना माहितीस्तव व सविनय सादर.

# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
## कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड
## निवीदा सुचना (SHORT TENDER NOTICE)

जा.क्र.बीपाविबीड / भांडार शाखा / 350/A दिनांक : 1|2|22

कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड या कार्यालया करीता खाली नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा रक्षक पुरविणे करीता नोंदणीकृत सुरक्षा रक्षक एजंन्सी कडुन मोहोरबंद दरपत्रके मागवित आहेत.

मोहरबंद दरपत्रके दिनांक 14.02.2022 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग,बीड या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीनपे पाठवावीत आहे. मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी 5.00 वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| 1 | प्रती सुरक्षा रक्षक ( बिन हत्योर ) प्रती दिवस दर 8 तास व तसेच प्रतिमाह दर | |

अटी व शर्ती.

1. देण्यात येणारे दर सर्व करासहीत देण्यात यावे.
2. देयक निधी उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल.
3. सुरक्षा रक्षकास कार्यालयात येणा-या / भेट देणा-या अभ्यागतांची नोंद ठेवावी लागेल.
4. सुरक्षा रक्षकाचे कामाचे तास कार्यालयीन वेळे प्रमाणे व दररोज एकुण 8 तास राहील.
5. नेमण्यात येणा-या सुरक्षा रक्षकाचे P.F.G.I.S. व इतर भत्ते इत्यादीशी कार्यालयाचा संबंध राहणार नाही. तसेच घडलेल्या एखाद्या अनुचीत प्रकाराबाबत देखील या कार्यालयाचा संबंध राहणार नाही.
6. एजंन्सी मार्फत नेमण्यात येणा-या सुरक्षा रक्षकाने सुट्टी घेतल्यास किंवा गैरहजर राहिल्यास त्याच्या ऐवजी तात्काळ दुसरा सुरक्षा रक्षक तैनात / हजर करणे आवश्यक
7. नेमण्यात येणा-या कोणत्याही सुरक्षा रक्षकास शासकिय सोयी सवलती चा लाभ मिळणार नाही. तसेच नेमण्यात आलेली व्यक्ती सुरक्षा रक्षक एजंन्सीची असल्या कारणाने त्यास शासकिय कामाचा अनुभव असलेबाबत अनुभवाचे प्रमाणपत्र मिळणार नाही.
8. सुरक्षा रक्षक दररोज गणवेशामध्ये हजर राहणे आवश्यक.
9. सुरक्षा रक्षक कार्यालयात आल्यावर व कामाचे तास संपल्यानंतर जातांना भांडारपाल किंवा भांडारशाखेतील कर्मचारी यांचकडे हजरी नोंदविल.
10. सुरक्षा रक्षक एजंन्सीचे देयक हे मासिक स्वरुपात व सुरक्षा रक्षकाच्या हजेरी प्रमाणे काढण्यात येईल.
11. नेमण्यात येणा-या सुरक्षा रक्षकांचे वय 50 वर्षाच्या आत असावे व तो शारिरीक दृष्टया तंदरुस्त व सक्षम असावा.

12. एजंन्सी मार्फत नेमण्यात येणा-या सुरक्षा रक्षकास मराठी, हिंदी भाषा बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक व इंग्री भाषा किमान समजणे व लिहीता येणे आवश्यक.

13. नेमण्यात येणार सुरक्षा रक्षक बिनहत्यारी असावा. त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचे शस्त्र आढळुन आल्यास किंवा त्याने शस्त्राचा वापर करुन एखादयास हाणी / ईजा / दुखपत पोहचवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी या कार्यालयाची किंवा मंडळ कार्यालयाची न राहता सुरक्षा रक्षक एजंन्सी ची किंवा त्याची स्वताची राहील.

14. कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड यांनी एक पेक्षा जास्त सुरक्षा रक्षक नेमावयाचे कळविल्यास तशी व्यवस्था करुन देणे बंधनकारक.

15. दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्य करण्याचा हक्क ( कोणतेही कारण न दर्शविता ) निम्न स्वाक्षरीकरांनी राखून ठेवलेला आहे.

कार्यकारी अभियंता,
बीड पाटबंधारे विभाग,बीड

दिनांक :-

जा.क्र.बीपाविबी / भांशा /

प्रत, मा.अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वै. यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत, विभागीय कार्यालयात नोटीस बोर्डावर.